# यशोगाथा

सांगली जिल्हयातील जत तालुकयाचे स्थान पूर्वेकडील अवर्षण प्रवण भागात येते. साधारणतः वार्षिक सरासरी ७५० मिमि पाऊस पडत असल्याने या भागामध्ये शेतीसाठी वर्षभर पाण्याची कमकरता भासते. वर्षभर पाण्याची शाश्वत उपलब्धता नसल्याने शेती दिवसेनदिवस तोटयात जात होती.

सदर भागातील प्रमुख पिके म्हणजे बाजरी, ज्वारी तसेच द्राक्ष आणि डाळिंब हि पिके घेतात पण पिकाच्या वाढीच्या अवस्थेवेळी पाणी टंचाईमुळे पिकांची वाढ होत नसल्याने उत्पन्नामध्ये वाढ होत नव्हती. तेव्हा सदर भागातील शेतकरी पाणी टंचाईवर उपाय म्हणून पिकाना टँकने पाणी पुरवठा करू लागले. परंतू येणारा खर्च व येणारे उत्पन्न यांच्या मध्ये मोठया प्रमाणात तफावत जाणवत होती.

श्री. शिवलिंग चन्नाप्पा संख रा जत हे शेतकरी आपल्या १०.८० हे. क्षेत्रा पेकी ५.०० हे. द्राक्ष पिक घेत होते त्यापासून त्यांना ४० मे.टन उत्पादनातून फक्त ६.०० लाख प्रती वर्ष उत्पन्न मिळत होते. तेव्हा उर्वरित पिकावू क्षेत्र लागवडीखाली येण्यासाठी श्री. शिवलिंग चन्नाप्पा संख हे इतर पाण्याच्या स्त्रोताच्या शोधात होते.

सन २००५-०६ मध्ये तालुका कृषि अधिकारी जत कार्यालयामध्ये कृषि अधिकारी यांचेबरोबर त्याना भेडसावणा-या अडचणी वरती चर्चा केली. सदर चर्चेमध्ये कृषि अधिकारी यांनी राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गात शेततळयाची माहिती देवून सामुहिक शेततळयाचा लाभ घेण्याचा सल्ला दिला.

कृषि अधिकारी यांनी केलेल्या मार्गदर्शनामूळे प्रेरित होवून श्री शिवलिंग चन्नाप्पा संख यांनी सामुहिक शेततळयाचा लाभ घेणे निश्चित केले. यामध्ये ते स्वतः व इतर चार सहभागीदार यांचे समवेत त्यांनी ४४ मी X ४४ मी X ५.४ मी आकारमानाचे १०००० घनमीटर पाणी साठा क्षमतेचे सामुहीक शेततळे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे पुर्ण केले.

राष्ट्रीय फलोत्पानद अभियान अंतर्गात सामुहिक शेततळयाचा लाभा घेतल्याने श्री.शिवलिंग चन्नाप्पा संख यांना खालील प्रमाणे लाभ झाला

**शेततळे घेण्यापुर्वीची फळबाग / भाजीपाला लागवड. (पीक निहाय)**

| अ. क्र. | पिकाचे नाव | क्षेत्र हे. | वार्षिक उत्पादन (मे.टन) | मिळालेला बाजारभाव (रू) | वार्षिक खर्च (रू) | उत्पादन खर्च (रू) | नफा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | द्राक्ष | ५ | ४० | ४० | १६ लाख | १० लाख | ६ लाख |

**शेततळे घेतल्या नंतरची फळबाग / भाजीपाला लागवड. (पीक निहाय)**

| अ. क्र | पिकाचे नाव | क्षेत्र हे. | वार्षिक उत्पादन (मे.टन) | मिळालेला बाजारभाव (रू/किलो) | वार्षिक उत्पन्न (रू) | उत्पादन खर्च (रू) | नफा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | द्राक्ष | ६ | १९० | ४० | ७६ लाख | ५२ लाख | २४ लाख |
| २ | डाळिंब | ४.८ | ६० | ५० | ३० लाख | २० लाख | १० लाख |







# यशोगाथा

मिरज तालुक्याचे सर्वसाधारणपणे दोन भाग पडतात. त्यामध्ये एक सदन बागायत मिरजचा पश्चिम भाग व दुसरा दुष्काळी पुर्व भाग असे दोन भाग आहेत. त्यामध्ये दुष्काळी भागातील शेतक-यांना वारंवार पडणारा दुष्काळ यामुळे मिरज पुर्व भागातील शेतक-यांना आपल्या शेतात भरपुर कष्ट करुनही म्हणावे इतके उत्पादन मिळत नाही. गेल्या २-३ वर्षा पासुन कार्यान्वीत असलेली म्हैशाळ कालव्याच्या योजनेमुळे पुर्व भागातील शेतक-यांना जेमतेम पाणी मिळु लागले. या मिळणा-या थोडक्या पाण्यावर शेतक-याचे उत्पन्न वाढवण्यासाठी कृषि विभागाने पुढाकार घेऊन शेतक-यांचे वेगवेगळया पिकाचे गट स्थापन करण्याचे काम केले. अशा स्थापन करण्यात आलेल्या गटाना पिकाबाबत मार्गदर्शन करणे,प्रक्षेत्र भेटीव्दारे माहीती देण्याचे काम सुरू आहे.

श्री. अमरसिंह अप्पासो पाटील रा.आरग यांनी पुर्व भागातील आरग, लक्ष्मीवाडी, शिंदेवाडी, लिंगनुर, खटाव या गावातील भाजीपाला उत्पादन करणा-या शेतकरी गटाना एकत्र करुन मे/ए.एस फर्म ही भाजीपाला उत्पादन करणा-या शेतक-याची एक संस्था चालु केलेली आहे. या गटामध्ये २०० शेतकरी सभासद असुन त्याच्यां १८७ हे. क्षेत्रावर भाजीपाला उत्पादन चालु आहे.सदरच्या संस्थेला राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत पुर्व शितकरण केंद्र व शितवाहन खरेदीसाठी अनुदान देऊन आर्थीक सहकार्य केले आहे. तसेच शहरी भागासाठी भाजीपाला पुरवठा प्रकल्पा अंतर्गत या संस्थेतील शेतक-यांना चांगल्या प्रतीचा भाजीपाला उत्पादनासाठी शेडनेट हाऊस, हरीतगृह उभारणीसाठी ही अनुदान देण्यात आले आहे.

या संस्थेमार्फत शेतक-याकडुन हमी भावावर शेतीमाल घेऊन बेबी कॅार्न,चेरी टोमॅटो, ब्रोकाली, मिरची, दोडका ढोबळी मिरची व पालेभाज्या अशा विविध प्रकारची पिके या संस्थेमार्फत शेतक-यांच्या शेतावर घेतली जातात. बेबी कॉर्न पीकामुळे अनेक शेतकरी दुग्ध व्यवसाय करुन आपले उत्पादन वाढले आहे.

गट/संस्था स्थापन करणे पुर्वी शेतकरी पारंपारीक पध्दतीने शेती करुण भाजीपाला उत्पादन घेत होते.त्यामुळे शेतक-याना जास्त खर्च होवून व कमी उत्पादन मिळत होते.

## राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत
## अर्थसहाय्य देण्यापूर्वी व दिल्या नंतर झालेला बदल

| अ क्र | योजना राबवीन्यापुर्वी | | | योजना राबविल्या नंतर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पिके | उत्पादीत माल मे.टन | उत्पादन (लाखात) | पीके | उत्पादीत माल मे.टन | उत्पादन (लाखात) |
| १ | दोडका | ८ | १.२० | दोडका | ८ | ३.५० |
| २ | वांगी | ३० | ४.५० | वांगी | ४५ | १८.४५ |
| ३ | पालेभाज्या | ५ | १.२० | पालेभाज्या | ५ | २.३० |
| ४ | गवार | १५ | २.८० | मिरची | २० | ३.०० |
| ५ | कारले | ८ | १.५० | चेरी टोमॅटो | २० | ६.०० |
| ६ | भेंडी | ३ | ०.२६ | ढोबळी मिरची | १०० | २०.०० |
| ७ | बाजरी (६९हे) | १३८ | १३.८० | थाई चिली | ५ | १.२५ |
| ८ | खरीप ज्वारी (६०हे) | १८० | १४.९० | लोटस | ५ | २.५० |
| ९ | | | ० | बेबी कॉर्न | ३०० | ९०.०० |
| १० | | | ० | स्वीट कॉर्न | २०० | १०.०० |
| ११ | | | ० | ब्रोकोली | १० | ४.०० |
| **एकुण** | | **३८७** | **४०.१६** | **एकुण** | **७१८** | **१६१.००** |

राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत अर्थसहाय्य दिल्या नंतर खास करून झालेला फरक बाजरी - ६९ हे. व खरीप ज्वारी - ६० हे. वरील क्षेत्र भाजीपाला पीकामध्ये समावीष्ट झाले आहे.

वरील प्रमाणे पुर्वी ३८७ मे. टन उत्पनापासुन ४०.१६ लाख रुपयाची वार्षीक उलाढाल होती आज या ७१८ मे टन उत्पनापासुन १६१.०० लाख रुपयाची वार्षीक उलाढाल या संस्थेमार्फत केली जाते,सदरची संस्था,गट एकत्रीकरणाचे काम कृषि विभागा मार्फत केले जात आहे.

सदरच्या संस्थेमार्फत आसपासच्या गावात वरील पिके घेण्यास प्रवृत्त केले जाते, तसेच शेतक-यांना लागणारे बि-बियाणे, खते व औषधे खरेदी करुण शेतक-याच्या शेतावर पुरवीली जातात व त्यासाठी लागणारे तसेच पीक उत्पादन तज्ञ मार्गदर्शकांना बोलावुन मार्गदर्शन केले जाते, पीक उत्पादनानंतर काढणी पश्चात हाताळणी संबधी उत्पादित मालंचे संकलन करणे साठी शीतवाहन व पुर्वशीतकरण केंद्र उपलब्ध करुन मार्केटींग साठी मार्गदर्शन करीत आहे.

तसेच शेतक-याकडील उत्पादीत केलेल्या मालाचे संकलन करणे व त्यावर प्राथमिक प्रक्रीया करुन तो माल प्रीकुलींग युनिट मध्ये ठेवला जातो व नंतर तो माल ऑर्डर नुसार पुणे,येथील वरुण ॲग्रो प्रोप्रा श्री श्रीनिवास खेर व आदीत्य फ्रेश प्रोप्रा श्री आठवले,व स्थानीक बाजार पेठेत तसेच शिल्लक माल प्रक्रीया उदयोगासाठी पुरविण्याचे काम केले जाते.





महाराष्ट्र शासन कृषी विभाग
राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत महाराष्ट्र राज्य
फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ यांच्या
अर्थसहाय्याने
शितवाहन











